REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 6 | MARCH - 2018

# वाचन संस्कृतीच्या मूळ जन्माचा विद्यापीठांना व शासनाला पडला विसर

डॉ. तुषार निकाळजे



## प्रस्तावना

दि. १ जुलै २०१७ पासून काही विद्यापीठांनी वाचन संस्कृती व वाचन चळवळ सुरू केल्याच्या बातम्या ऐकल्या. आणि त्या अनुषंगाने वाचन म्हणजे काय, त्याचा उगम, जन्माचा इतिहास असे काही मनात विचार तरळू लागले. सहा महिन्यांपूर्वी उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी भिलार गावास पुस्तकांच गाव जाहिर केले. त्या गावात हजारोच्या संख्येने पुस्तके, ग्रंथ, साहित्य इत्यादि उपलब्ध केले. लोकांनी पर्यटनाबरोबरच तेथे येवून पुस्तके, ग्रंथ वाचावित यासाठी हे सर्वकाही केले. या गावाच्या विकासासाठी साडेपाच कोटी रूपये खर्च केले. तदनंतर काही विद्यापीठांना असे काही करावेसे वाटले. शासनास आणि विद्यापीठांना असे का वाटले? याचा मागोवा घेतला असता २००९ साली एका वर्तमानपत्रातील बातमी आठवली. ''विद्यापीठे व उच्च शिक्षण संस्थांसाठी पुस्तके आणि ग्रंथ प्रसारासाठीची साडेअकरा कोटी रूपयांची तरतुद होती. त्यातीलही जेमतेम सव्वाचार कोटी रूपयेच वापरले गेले''. याचा अर्थ ग्रंथप्रसारावर तरतुदीच्या निम्माही खर्च नाही. शासनाच जावू देत, शासनाला हजारो प्रकारची कामे असतात. त्यांना उशिरा का होईना कळले. पण विद्यापीठाच काय? विद्यापीठांना ६० वर्षांनी उपरती झाली. ज्ञानाच्या महासागराला ऑक्टोपस, देवमासा, स्टारफिशचा विसर कसा पडला? असो देरसे होकर आये दुरूस्त होकर आये! याच स्वागत. विद्यापीठाला वाचन चळवळीच पडलेल हे स्वप्न... युरेका युरेका....

तरीही विद्यापीठांना व शासनाला या वाचन चळवळ, संस्कृतीचे मूळ जन्मस्थान किंवा उगमस्थानाचा विसर पडलेला दिसतो. वाचनाआधीची प्रक्रिया म्हणजे प्रकाशन - छपाई, प्रकाशन-छपाई-आधी लेखन-लिखाण. विद्यापीठ व शासन लेखन-लिखाणासच प्रोत्साहन देत नाही असे म्हणने कदाचित चुकीचे होईल. एका नामांकित विद्यापीठातील एका कारकूनान पुस्तक लेखनाचा केलेला प्रयत्न आणि विद्यापीठ-शासन यांची नाकर्तेपणाची भूमिका याचा अनुभव या लेखात नमूद केला आहे.

या नामांकित विद्यापीठातील एक कारकून (क्लार्क) त्याचे शिक्षण एम.फिल, पीएच.डी. पूर्ण झालेले. त्याने हे शिक्षण विनावेतनी रजा, अर्जित रजा, अर्धवेतनी रजा घेऊन पूर्ण केलेले. त्याचबरोबर एक शैक्षणिक उपयुक्ततेचे पुस्तकही लिहिलेले. या सेवकास दुसरे पुस्तक लिहावयाचे होते. त्यासाठी विद्यापीठ किंवा शासनाकडून कोणत्या प्रकारची मदत मिळते का? याचा विचार करून त्याने विद्यापीठास एक विनंती अर्ज केला. ''सहा महिने पुस्तक लेखनासाठी वेतनी रजा मिळणेबाबत.'' या अर्जात त्याने स्पष्ट उल्लेख केला होता, अशा प्रकारचा नियम सेवकांसाठी नाही पण प्राध्यापकांसाठी सबायटिकल रजा प्रकारचा नियम आहे. अशा प्रकारचा नियम शिक्षकेतर सेवकांसाठी तयार व्हावा आणि नवा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे पाठवावा. म्हणजे शासनाच्या नवीन ध्येय-धोरणांमध्ये बदल होईल. पण विद्यापीठाने त्यास पत्र दिले ''नियम दाखवा व त्यासंदर्भातील संदर्भ प्रकरणांची माहिती द्यावी.'' सेवकाने विद्यापीठास खालील माहिती पत्राव्दारे दिली व या पत्राव्दारे शासनास प्रस्ताव पाठवावा अशी विनंतीही केली.

१) महाराष्ट्र नागरी सेवा नियमानुसार रजा हा विषय संबंधित कार्यालयाच्या आस्थापनेने निर्णय घेणे आवश्यक आहे.

२) महाराष्ट्र विद्यापीठ कायदा पृष्ठ ११ अनुक्रमांक ३२ व ३४ नुसार अध्यापक आणि अध्यापकेत्तर कर्मचारी यांच्या प्रशिक्षणासाठी आणि त्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी तरतुद करणे.

३) युनिव्हर्सिटी स्टॅचुट (विद्यापीठ परिनियम) मध्ये प्राध्यापकांकरीता नियम क्र. ५ मध्य सबायटीकल स्वरूपाची रजा नमूद आहे.

४) भारताचे संविधान १४, १५ नुसार नियमांत भेदभाव नसावा.

५) भारताचे आदरनिय व दिवंगत पंतप्रधान पंडित नेहरू यांनी 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' हे पुस्तक तुरूंगात असताना लिहिलेले होते. त्याकरिता इंग्रज सरकारने त्यांना विविध सवलतीदेखील दिल्या होत्या. आजही याची डॉक्युमेंटरी जगप्रसिध्द आहे. त्यामुळे संपूर्ण जगाला भारताची भौगोलिक व सांस्कृतिक ओळख झाली.

६) आदरनिय व दिवंगत स्वातंत्र्यवीर टिळक यांनीदेखील तुरूंगात असताना लिखाण केले. इंग्रज सरकारने त्यांना लिखाणासाठी सेवा पुरविल्या होत्या. लोकमान्य टिळक यांचे ते लिखाण आजही प्रबोधन करणारे आहे.

७) कल्पना व ज्ञान या व्यापाराशी निगडीत असलेल्या महत्वपूर्ण बाबी आहेत. एखाद्या नवीन औषधाला किंवा तांत्रिक उत्पादनाला जे मूल्य मिळते ते खरे तर त्यातील नाविन्यपूर्ण शोध, संशोधन, आरेखन किंवा चाचणी यांचे असते. चित्रपट, पुस्तक, कॉम्प्युटर सॉफ्टवेअर इत्यादींची जी खरेदी-विक्री होत असते ती त्या प्लास्टीक, कागद किंवा लोखंडामुळे होते असे नाही. तर त्या विकल्या जातात ते त्यांच्या क्रियाशिलतेमुळे, नाविन्यपुर्ण माहितीमुळे! तेव्हा बदलत्या समाजाच्या वाढत्या गरजा पूर्ण होण्यासाठी अधिक सुखकर जीवन जगता यावे यासाठी समाजात संशोधन, नाविन्यपूर्णता, क्रियाशिलता यांना प्रोत्साहन देणे व त्यांचे संरक्षण होणे गरजेचे बनते. (बुलेटीन ऑफ युनिक ॲकेडमी १ जुलै २०१६).

८) समाजाच्या सर्वसाधारण गरजा पूर्ण न होणे म्हणजे दारिद्र्य होय. दारिद्र्याची दोन परिमाणे आहेत - भौतिक आणि अभौतिक. भौतिक दारिद्र्य म्हणजे अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण आणि दळणवळण आदींचा अभाव असणे. या व्यतिरिक्त अभौतिक घटकांमध्ये लिंगभावात्मकता, धर्म, परंपरा आणि जाताधारित भेदभाव आदींचा समावेश होतो.

९) जर्मन समाजशास्त्रज्ञ मॅक्स वेबर याचे समाजशास्त्राच्या विकासामध्ये फार मोठे योगदान आहे. वेबर यांनी सामाजिक परिवर्तनाचे स्वरूप आणि कारणे समजून घेण्याचा प्रयत्न केला. फक्त आर्थिक घटकच परिवर्तनास कारणीभूत ठरतात. या कार्ल मार्क्स यांच्या विचारांशी तो सहमत नाही. (संदर्भ : महिला व बालकल्याण, गणराज पब्लिकेशन, पुणे).

१०) समजा आजपर्यंत कोणत्याही शिक्षकेतर सेवकांनी पुस्तक लेखनासाठी वेतनी रजा घेतली किंवा मागितली नसेल किंवा तशी परिस्थिती निर्माण झाली नसेल, सन १९७२ सालापासून आजपर्यंत शिक्षकेतर सेवकांच्या नियमांत पुस्तक लेखनासाठी वेतनी रजेची तरतुद नाही. याचा अर्थ असाही होवू शकत नाही की यापुढे हा नियम होणार नाही किंवा दुरूस्ती होणार नाही. आज मी मागणी करीत आहे. म्हणून मला सदर वेतनी रजा मिळावी. कारण माझी ही गरज आहे.

११) आपल्या विद्यापीठाच्या प्रशासकीय शिक्षकेतर अधिकाऱ्यांच्या वेतनवाढीत प्राध्यापकांप्रमाणे समकक्षता होण्यासाठी विद्यापीठ प्रशासनाकडून शिफारशी होत असतील तर मी देखील शिक्षकेतर सेवक असल्याने मी त्यास अपवाद होवू शकत नाही.

१२) स्त्रियांना प्रसुतीकरीता रजा (नैसर्गिक बदल) मिळते. काही कार्यालयातील महिला अथवा पुरूष सेवकांना त्यांची मुले १८ वर्षे वयाची होईपर्यंत दोन वर्षे संगोपन रजा मिळते. गंभीर गुन्हे केलेल्या कैद्यांना देखील पॅरोल रजा मिळते. मग मी जर विचारांचे संगोपन करीत असेल आणि हे विचारांच संगोपन पुस्तक स्वरूपात अमलात आणित असेल तर मला फक्त सहा महिने रजा का मिळू नये? किंवा मी या पुस्तकाव्दारे किंवा विचारांव्दारे एखादे विध्वंसक क्षेपणास्त्र जन्माला घालीत नाही ना? आणि म्हणून मला प्रश्न विचारून रोखण्याचा प्रयत्न.

१३) याच्याही पलीकडे जावून विचार करावयाचा असल्यास मी ज्या काही गोष्टींचा विचार करतो त्यास नियमांचा अभाव असला तरी विद्यापीठात नवीन पायंडा किंवा प्रथा पडणार आहे व त्यावर धोरणात्मक निर्णय व्हावा असे आपल्याच पदाधिकाऱ्याचे मत आहे.

१४) कोणतीही घटना घडते किंवा परिस्थिती बदलते ती नियम किंवा कायद्यानुसार नाही. परंतु घटना घडणे किंवा परिस्थिती बदलणे यावर नियम किंवा कायदे तयार होत असतात किंवा त्यामध्ये बदल केले जातात.

१५) असो लिहिण्यासारख्या बऱ्याच गोष्टी आहेत. परंतु मला पुस्तक लेखनासाठी वेतनी रजा मंजुर झाल्यास आपले विद्यापीठ महाराष्ट्रातच नव्हे तर कदाचित भारतात पहिले विद्यापीठ असेल, ज्या विद्यापीठाने शिक्षकेतर सेवकास किंवा कर्मचाऱ्यास प्रथमतः विचार प्रक्रियेत समाविष्ट केल्याचे उदाहरण असेल व याची कॉपी इतर संस्था, विद्यापीठे करतील.

१६) सदर बाबतीत धोरणात्मक निर्णय घ्यावयाचा असल्यास दि. १९/०७/२०१६ रोजी होणाऱ्या व्यवस्थापन परिषदेमध्ये सदर प्रस्ताव ठेवावा व त्यावर निर्णय घ्यावा, असे वाटते. या पत्राव्दारे आपणास पुनःश्च नम्र विनंती मला सलग सहा महिने वेतनी रजा मिळावी. पुढील निर्णय आपल्या अधिकारकक्षेत.

१७) जर तुम्ही तुमच्या कल्पना प्रत्यक्षात उतरवल्या नाहीत तर त्या नष्ट होतात. (रॉजर वॉन ओच).

१८) प्रत्येक माणसाचं आयुष्य म्हणजे जणू एक पुस्तकच असतं. त्याच्या आयुष्यातील बऱ्या-वाईट घटनांच्या पानांनी ते पुस्तक भरलेल असतं. आपण पुस्तकं वाचून माहिती, ज्ञान मिळवतो, मग माणसं का वाचत नाही बरं? (महाराष्ट्र टाईम्स, पुणे १३ नोव्हेंबर २०१६).

हे सर्व विद्यापीठाच्या कुलसचिवांना सादर केले. व्यवस्थापन परिषदेत प्रस्ताव ठेवला गेला नाही. परंतु त्या सेवकास पुन्हा विद्यापीठाचे पत्र आले ''नियम दाखवा'' आणि प्रकरण बंद झाले. लेखनासाठी सेवकांना रजा अथवा आर्थिक सवलती नाहीत म्हणून तर हे त्या सेवकाने केले. एकूण काय तर लिखाणासाठी प्रोत्साहन दिल्यास पुस्तके, ग्रंथ तयार होतील. त्या सेवकास पुस्तक लेखनासाठी रजा दिली गेली नाही. नंतर त्या सेवकाने स्वतःच्या रजा खात्यातील ११७ दिवस अर्धवेतनी रजा घेतली व पुस्तक लिहून प्रकाशित केले. या अर्धवेतनी रजेचा तोटा रू. १,१७,४५१/- (रूपये एक लाख सतरा हजार चारशे एक्कावन्न फक्त) त्या सेवकास सहन करावा लागला. विद्यापीठातील प्राध्यापकांनी पुस्तक लिहिले व प्रकाशित केले तर त्यांना रू.३५,०००/- पर्यंत आर्थिक मदत मिळते. लिखाण कामासाठी सबायटिकल रजेसारख्या वेतनी रजा एक वर्षापर्यंत मंजूर होतात. मग कर्मचाऱ्यांची पात्रता असताना असे का? एका विद्यापीठातील २५० प्राध्यापकांनी २०११ ते २०१७ या कालावधीत फक्त ३१० पुस्तके प्रकाशित केली. सात वर्षात एका प्राध्यापकाने सरासरी एकच पुस्तक लिहिले. पण कर्मचाऱ्याने दोन पुस्तके लिहून प्रकाशित केल्याची उदाहरणे आहेत. प्राध्यापक मंडळी स्वतःचे पीएच.डी. संशोधनाचे पुस्तक देखील तयार करून प्रकाशित करीत नाही. त्यांच्या संशोधनाची मग वेगळीच शंका येते. संशोधन प्रकाशित का करीत नाहीत? कधी कधी प्राध्यापकांच्या भरती प्रक्रिया होत असतात. त्यांच्या पात्रतेच्या निकषामध्ये पुस्तके किती लिहिली? याचा उल्लेख असतो. त्याप्रमाणे त्यांना मुलाखतीच्यावेळी व निवडीच्यावेळी प्राधान्य दिले जाते. काही प्राध्यापक डमी पुस्तके तयार करून मुलाखतीच्या अर्जासोबत जोडतात. त्यांची नियुक्तीही होते. पण ही पुस्तके नंतर पुस्तक विक्रेते, इंटरनेट, ग्रंथालये येथे शोधल्यानंतर ते मिळत नाहीत. याचा अर्थ काय समजावा?

या सर्वच घटनांचा मागोवा घेतल्यास असे निदर्शनास येते की ''वाचन संस्कृतीचा मूळ जन्म लिखाणाव्दारे होतो.'' याचा विसर विद्यापीठ व शासनास पडला असावा.